।। शिलम् परम् भूषणम् ।।

हिंदमाता शिक्षण मंडळ



# मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय

बोरगांव. ता. वाळवा, जि. सांगली. ४१५४१३.

## मराठी व इंग्रजी विभाग आयोजित व
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पुरस्कृत

## एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

# २१ व्या शतकातील भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृतीतील परिवर्तन

**शुक्रवार दि. २९ डिसेंबर २०१७**

**बौध्दिक सहयोग**

## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर.

| डॉ. मिलींद देसाई | प्रा. विठ्ठल रोटे | डॉ. श्रीमती सुवर्णा पाटील | डॉ. एस. बी. माने |
|---|---|---|---|
| सहसमन्वयक | सहसमन्वयक | समन्वयक | प्राचार्य |

✲ मार्गदर्शक :

- **मा. माणिकराव पाटील (आबा)**
  मानद सचिव, हिंदमाता शिक्षण मंडळ
- **मा. अभिजीत पाटील (दादा)**
  संचालक, हिंदमाता शिक्षण मंडळ

## कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| ९ ते १० | नांव नोंदणी व चहापान |
| १० ते १२ | उद्घाटन व बीजभाषण |
| १२ ते १ | प्रथम सत्र |
| १ ते २ | भोजन |
| २ ते ३ | द्वितीय सत्र |
| ३ ते ४ | शोधनिबंध वाचन |
| ४ ते ५ | समारोप समारंभ |

## संयोजन समिती

प्राचार्य, डॉ. एस.बी. माने
डॉ. एस. टी. पाटील
डॉ. ए. डी. सत्रे
डॉ. पी. वाय. बुरुटे
श्रीमती के. बी. पाटील
प्रा. व्ही. के. मोरे
प्रा. यु. एन. सुर्यवंशी
डॉ. श्रीमती सी. एस. बोधले
श्रीमती यु. बी. करसाळे
श्री. व्ही. आर. यादव
श्री. एम. व्ही. ठोंबरे
श्रीमती पी. एम. सावंत

## संपर्क


- डॉ.श्रीमती सुवर्णा पाटील 7757972256 suvarnanpatil1974@reddiffmail.com
- डॉ. मिलिंद देसाई 9766428424 79desaimilind@gmail.com
- प्रा. विठ्ठल रोटे 9764824220 vnrote@gmail.com


## चर्चासत्राचे ठिकाण

मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव (नवीन इमारत)
ता.वाळवा, जि. सांगली ४१५४१३

बुक - पोस्ट

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

महोदय,

आमच्या महाविद्यालयामध्ये शुक्रवार दि. २९ डिसेंबर, २०१७ रोजी २१ व्या शतकातील भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृतीतील परिवर्तन या विषयावर एक दिवसीय आतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले असून आपणांस निमंत्रित करण्यात येत आहे.

## ■ आमची संस्था :

हिंदमाता शिक्षण मंडळ, बोरगांव ची स्थापना स्व. मोहनराव पाटील (आण्णा) यांनी ८ डिसेंबर १९६४ रोजी ग्रामीण भागातील मुला–मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून केली. संस्थेच्या स्थापनेपासून शिक्षण समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे. मा. माणिकराव पाटील (आबा) यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ५० वर्षे शिक्षण सेवेचे अविरत कार्य सुरु आहे.

## ■ आमचे महाविद्यालय :

ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून मा. माणिकराव पाटील (आबा) यांच्या प्रयत्नातून महाविद्यालयाची स्थापना जून २००१ मध्ये झाली महाविद्यालयाची वाटचाल मा.अभिजीत पाटील (दादा) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. ग्रामीण भागातील मुले–मुली शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकासातून समाजाची गुणवत्ता वाढविण्याच्या प्रयत्न करण्याचे ध्येय घेवून ग्रामीण भागातील या महाविद्यालयामध्ये कला शाखेचे उच्च शिक्षण ४ विभागांच्या माध्यमातून दिले जात आहे. महाविद्यालयातील शिक्षक उच्च विद्याविभूषित असून त्यांनी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रामध्ये शोधनिबंध सादर केलेले आहेत व संशोधन प्रकल्प हाती घेतलेले आहेत.

## ■ चर्चासत्राविषयी :

२१ व्या शतकातील दोन दशकांची वाटचाल करीत असताना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरती अनेक परिवर्तने झाली समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय, ऐतिहासिक, धार्मिक , साहित्यिक आणि भाषा अशा विविध क्षेत्रात वेगवेगळ्या घटना घडल्या व उलथापालथी झाल्या. अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागले या सगळ्यांचा परिणाम प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या निश्चितच  भाषा, साहित्य, समाज व संस्कृतीवरती झाला एका क्षेत्राचा परिणाम दुसऱ्या क्षेत्रावरती होत असताना अर्थकारण, राजकारण, समाजकारण ढवळून निघालं नवीन संस्कृती उदयास येवू लागली इतिहासाची मोडतोड होऊन नवीन इतिहास रचला जाऊ लागला या सर्वांचं प्रतिबिंब अर्थातच साहित्यामध्ये पडू लागलं आणि या सर्व बदलाला अविष्कृत करणारी भाषा ही गरजेनुसार बदलू लागली. या सर्व बदलांचा समाजातील परिवर्तनाचा विविध क्षेत्रांच्या एकमेकांवरील परिणामांचा संशोधनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणूनच २१ व्या शतकातील भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृतीतील परिवर्तन या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केलेले आहे.

## ▪ उपविषय :

- २१ व्या शतकातील शेती, उद्योग आणि पर्यटन
- २१ व्या शतकातील मनो–सामाजिक आव्हाने
- २१ व्या शतकातील महिला सबलीकरण
- २१ व्या शतक आणि मराठी हिंदी इंग्रजी साहित्य
- २१ वे शतक आणि सामाजिक आर्थिक धार्मिक राजकीय सांस्कृतिक परिवर्तन
- २१ व्या शतकातील साहित्यातील नवे पैलू व प्रवाह
- २१ व्या शतकातील सामाजिक शास्त्रापुढील आव्हाने आणि बदल
- २१ व्या शतकातील भाषा आणि संस्कृती
- २१ व्या शतकातील समाज आणि भाषेचे बदलते स्वरूप
- २१ व्या शतकातील क्रीडा धोरण, क्रीडा विषयक संधी आणि महत्व
- २१ व्या शतकातील ग्रंथालयांचे बदलते स्वरूप व त्यांची उपयुक्तता
- २१ व्या शतकातील माहिती तंत्रज्ञान आणि त्याचा साहित्य व संस्कृतीवरील परिणाम
- २१ व्या शतकातील बदलती शिक्षणपध्दती

या व्यतिरिक्त मुख्य विषयाशी संबंधित असणारे शोधनिबंध स्विकारले जातील.

## ▪ शोधनिबंधाविषयी :

सर्व शोधनिबंध इंग्रजी माध्यमासाठी MS-Word मध्ये Times New Roman Font, Size 12 व मराठी आणि हिंदी माध्यमासाठी MS-word मध्ये Shree Lipi, DV-TT Surekh किंवा Kruti Dev 055 या लिपीमध्ये, Size 16, Line Spacing 1.5 मध्ये असावे. शोधनिबंधासाठी शब्दमर्यादा २००० शब्द व संशोधन गोषवारा (abstract) हा २०० शब्दात देणे बंधनकारक.

**संशोधन गोषवारा** – दि. १५ डिसेंबर २०१७ व पूर्ण शोधनिबंध दि. २२ डिसेंबर २०१७ पर्यंत vnrote@gmail.com किंवा marathinational@gmail.com या मेलवर पाठवावेत.

## ▪ नोंदणी फी

- **शिक्षकांसाठी रु. ५००/–**
- **विद्यार्थ्यांसाठी रु. ३००/–**

नोंदणी फी प्राचार्य, मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव यांचे नावे बँक ऑफ इंडिया, शाखा – बोरगांव. खाते क्र. १६१२२०११००००००४, IFSC Code - BKID0001612 या खात्यावर किंवा रोखीने जमा करावी.